# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

☏ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **Email : ropune.dte@gmail.com**


जा. क्र. : तंशिविकापु/विवि/प्रवेश /२०१६/१४८१ दिनांक : ०५/०४/२०१६

07 APR 2016

**अधिसुचना**

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसाईक पदविका /पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत....

संदर्भ - मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/२०१६/४३३ दिनांक ३०/०३/२०१६.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसाईक पदविका /पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्राची सुची संदर्भिय पत्राव्दारे मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनाल म रा मुंबई यांचेकडून प्राप्त झालेली आहे. सदर पत्राची छायाप्रत सोबत जोडलेली आहे.

सदर पत्राची छायाप्रत सर्वांचे माहिती व आवयक कार्यवाहीसाठी सोबत जोडलेली आहे. कृपया सदर पत्राचे अवलोकन करावे

प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत- १) प्राचार्य / संचालक या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व व्यावसाईक पदविका /पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था यांना महितीसाठी

२) प्रोग्रमार यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी § 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@gmail.com Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


197

अधिसूचना

क्रमांक : २अ/एडीएम/प्रमाणपत्रे/२०१६/ ४३३
दिनांक : 30 MAR 2016

विषय : शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली प्रमाणपत्रे प्राप्त करुन घेण्याबाबत...

महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ , दिनांक १७.८.२०१५ नुसार महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायीक शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित तदनुषंगिक बाबीसाठी "प्रवेश नियामक प्राधिकरण" आणि "शुल्क नियामक प्राधिकरण" या दोन प्राधिकरणांची स्थापना करण्यात आलेली आहे. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरणांतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष निर्माण केलेला आहे. या अधिनियमानुसार तंत्रशिक्षणातील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश नियम व प्रवेश पात्रता शासनाने राजपत्राद्वारे दिनांक ११.३.२०१६ रोजी प्रसिध्द केले आहेत.

शासकीय व अशासकीय अनुदानीत संस्थांमधील व्यावसायिक पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीसुध्दा सदर प्रवेश नियम लागू करण्याबाबत शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक टीईएम-२०१६/प्र.क्र.५३६/तांशि-४,दिनांक १५.३.२०१६ निर्गमित केलेला आहे.

उपरोक्त अधिनियम, सर्व राजपत्रे व शासन निर्णय संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध आहेत.

सदर प्रवेश नियमावली व प्रवेश अर्हतेनुसार पात्र असलेल्या व शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये तंत्रशिक्षणातील व्यावसायिक अभ्यासक्रमांपैकी खालील

- प्रथम वर्ष एम.ई./एम.टेक., एम.फार्म., एम.आर्किटेक्चर, एम.एचएमसीटी , एमबीए/एमएमएस, पदव्युत्तर पदवी तसेच प्रथम वर्ष एमसीए व थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी (Post Graduate Degree)
- प्रथम वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,फार्म.डी., वास्तुशास्त्र , हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी (Degree)
- थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र पदवी (Degree)
- प्रथम वर्ष पोस्ट एचएससी अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका (Diploma)
- प्रथम वर्ष पोस्ट एसएससी अभियांत्रिकी पदविका (Diploma)
- थेट द्वितीय वर्ष पोस्ट एसएससी अभियांत्रिकी पदविका(Diploma)

अभ्यासक्रमास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, संबंधित उमेदवारांनी खालील प्रमाणपत्रे प्राप्त करून घ्यावी.

१) जात प्रमाणपत्र (Caste Certificate)

सामाजिक मागास प्रवर्गातून प्रवेश घेऊ इच्छिणारे <u>महाराष्ट्र राज्यातील</u> उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी सदर जात महाराष्ट्र शासनाच्या मागासवर्गीयांच्या अधिकृत यादीमध्ये मोडत असल्याचे संबंधित विद्यार्थ्यांच्या नावाने दिलेले जात प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र : (Non-Creamy Layer Certificate) :

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व्यतिरिक्त उर्वरीत सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना प्रगत व उन्नत गटाचे (नॉन क्रिमी लेअरचे) तत्व लागू केलेले आहे. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या

D:\Budage\२०१६-१७\General Correspondence\notification for certificate march २०१६.docx

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
31 MAR 2016
आवक क्र. 3238

संबंधित प्राधिकाऱ्यांनी दिलेले व दि.३१/०३/२०१७ पर्यंत वैधता असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) आवश्यक आहे.

३) जात/जमात वैधता प्रमाणपत्र (Caste/Tribe Validity Certificate)

सामाजिक मागास प्रवर्गातील उमेदवारांना राखीव जागांवर प्रवेश घ्यावयाचा असल्यास महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्याच्या नावे दिलेले जात/जमात वैधता प्रमाणपत्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सादर करणे अनिवार्य आहे.तथापि पदविका अभ्यासक्रमासाठी जात/जमात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य नाही. मात्र अन्य आर्थिक सवलतीसाठी संबंधित विभागाच्या धोरणानुसार सदर प्रमाणपत्र आवश्यक आहे किंवा कसे याची खात्री करून उमेदवारांनी स्वत: निर्णय घ्यावा.

४) अधिवास प्रमाणपत्राबाबत (Domicile Certificate)

उपरोक्त प्रवेश नियमांनुसार प्रवेशासाठी अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असल्यास सदर उमेदवारांनी महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यांनी विद्यार्थ्याच्या नावे दिलेले किंवा त्याच्या आई/वडिलांच्या नावाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) आधार कार्ड

उमेदवाराने भारत सरकारच्या वतीने देण्यात येणारा आधार कार्ड नंबर प्राप्त करून घ्यावा. शासनाच्या विवीध योजना, शिष्यवृत्ती, इत्यादीसाठी आधारकार्ड क्रमांक अभिप्रेत आहे.

६) उत्पन्नाचे प्रमाणपत्र (Income Certificate)

उमेदवारांना AICTE च्या Tution Fee Waiver Scheme अंतर्गत प्रवेश घ्यावयाचा असल्यास उमेदवाराच्या कुटुंबाचे आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील एकत्रित वार्षिक उत्पन्न रूपये ६.०० लाखपर्यंत असल्याबाबतचे महाराष्ट्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-यांनी दिलेले प्रमाणपत्र आवश्यक आहे.

जे उमेदवार Person with Disability /Defence/अल्पसंख्यांक इ.संवर्गातून प्रवेश घेऊ इच्छित असतील त्यांनी संबंधित प्रमाणपत्रे/कागदपत्रे तयार ठेवावीत.

**प्रवेश अर्जाच्या स्वीकृतीच्यावेळी जर आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे संबंधित उमेदवार सादर करु शकला नाही, तर त्यास संबंधित प्रवर्गाच्या आरक्षणाचा किंवा प्रवेश नियमातील तरतूदींचा फायदा मिळणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, याची नोंद घ्यावी.**

प्रवेशाबाबतची माहिती संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर आणि या संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. अधिक माहितीसाठी या संचालनालयाच्या विभागीय कार्यालयांकडेही संपर्क साधता येईल.

| | |
|---|---|
| मुंबई-- ०२२-२६४७४८९२ , २६४७१६१९ | औरंगाबाद--०२४०-२३३४२१६,२३३४७६९ |
| पुणे-- ०२०-२५६५६२३४, २५६७८९७३ | अमरावती-- ०७२१-२५७३०२७ |
| नाशिक- ०२५३-२४६१४७९, २४६०११४ | नागपूर-- ०७१२-२५६५१४३,२५४९३८७ |

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

D:\Budage\२०१६-१७\General Correspondence\notification for certificate march २०१६.docx